हॉटेल राजलक्ष्मी
व्हेज & नॉनव्हेज
प्रो.प्रा.अजिंक्य (भैया) शिराळे
एक वेळ अवश्य भेट द्या बार्शी रोड,बीड-431122

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र । मंगळवार दि. ०५ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४६ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

स्वराज
वॉटर सोल्युशन
आमच्याकडे सर्व कंपनीच्या वॉटर फिल्टरची विक्री व दुरुस्ती योग्य दरात केली जाईल.
प्रो.प्रा.अजय भोसले
9673798477
8830127742
मधुमीना कॉम्प्लेक्स, राजीव गांधी चौक, बीड



संकष्ट चतुर्थी चंद्रोदय १०:१८

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा विजय

## मोडले दादांचे रेकॉर्ड, म्हणाल्या, मन खूप भरुन येतंय!



**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा विजय झाला आहे. सुनेत्रा पवारांनी दिवंगत अजित पवारांचे रेकॉर्ड देखील मोडीत काढत मोठे मताधिक्य मिळवलं आहे. देशात सर्वाधित मतांनी निवडून येणाऱ्या आमदार सुनेत्रा पवार झाल्या आहेत. या सगळ्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवारांनी केलेल्या विकासकामांचे प्रतिक म्हणून बारामतीकरांनी भावांजली वाहिली आहे, असं सुनेत्रा पवारांनी म्हटलं आहे. त्या प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होत्या. सुनेत्रा पवार म्हणाल्या, अजित पवारांनंतर ही पहिलीच निवडणूक आहे. अशापद्धतीने निवडणुकीला सामोरे जावे लागेल, असे मला कधीच वाटले नव्हते. मन खूप भरून येत आहे. अजित पवारांनी केलेल्या विकासकामांचे प्रतिक म्हणून बारामतीकरांनी भावांजली वाहिली आहे. अजित पवारांनी जनतेवर केलेले प्रेम, सेवा ही बारामतीकरांनी मतातून दाखवली आहे. बारामतीकरांनी केलेल्या मतातून अजित पवारांवरचा आढळ विश्वास माझ्या पाठीशी देखील उभा केला आहे. अजित पवारांना आदरांजली वाहताना माझ्यावर दाखवलेल्या विश्वासासाठी बारामतीकरांचे आभार मानते. माझ्यावर जबाबदारी वाढलेली आहे. अजित पवारांनी दाखवलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी बारामतीकरांनी एवढे मतदान दिले आहे, असे सुनेत्रा पवारांनी म्हटलं. बारामतीकरांना अशाप्रकारची निवडणूक हवीच नव्हती. ही वेळ जल्लोषाची नाही. आदरांजलीची आहे. अजित पवारांना जसे शिस्त आणि संयमाची सवय होती, त्याप्रकारे कार्यकर्त्यांनी दाखवावे, अशी विनंती करते. अचानक झालेल्या आघातामुळे मी निवडणुकीला उभे राहील, ▶▶ उर्वरित पान २ वर

**● सुनेत्रा पवारांना किती मते?**

▶ २ लाख, १८ हजार ९30 मते

**● देशात सर्वाधिक मताधिक्यानं निवडून आलेले आमदार**

▶ सुनील कुमार शर्मा- साहिबाबाद( उत्तरप्रदेश) - २ लाख 1४ हजार ८3४ - २0२२
▶ पंकज सिंह - नोएडा ( उत्तर प्रदेश ) - 1 लाख ८1 हजार ५13 - २0२२
▶ अजित पवार - बारामती ( महाराष्ट्र ) - 1 लाख ६५ हजार २६५ - २01९
▶ काशीराम पावरा - शिरपूर ( महाराष्ट्र ) - 1 लाख ४५ हजार ४४४ - २01४

शुध्द सोन्या-चांदीच्या दागिन्यांची हमी मजुरीही कमी..!
कैलास ज्वेलर्स
9420469999
सुभाष रोड, कबाडगल्ली कॉर्नर, बीड

# ममता बॅनर्जींना सर्वात मोठा धक्का

## ऐन वेळी निवडणुकीत पराभव, सुवेंदू अधिकारी यांचा दणदणीत विजय!

**वृत्तसंस्था**




पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा ऐतिहासिक विजय झाला आहे. सत्तेत असलेल्या तृणमूल कॉंग्रेसला पाणी पाजत भाजपाने तेथे सत्ता खेचून आणली आहे. दुसरीकडे काहीही झालं तरी आम्हीच निवडणूक जिंकणार असं म्हणणाऱ्या तृणमूल कॉंग्रेसला या निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत तृणमूलचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले आहेत. या पक्षाच्या सर्वेसर्वा तथा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा या निवडणुकीत विजय होणार की पराभव? याकडे संपूर्ण देशाचेच लक्ष लागले होते. दरम्यान, आता ममता बॅनर्जी यांच्या भवानीपूर या मतदारसंघाचा निकाल समोर आला असून ममता बॅनर्जी यांना जबर धक्का बसला आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# तामिळनाडूची सत्ता नव्या 'थलापती'कडे

## अनेक धुरंधरांना चारीमुंड्या चीत करत विजय जोसेफ बनले किंग

**वृत्तसंस्था**



अभिनेते विजय यांच्या 'तामिळगा वेत्री कळघम' पक्षाला तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत मिळालेलं अभूतपूर्व यश अनेक अर्थांनी महत्त्वाचं आहे. त्यांनी तब्बल पाच दशकांच्या... दोन अक्षांमध्ये विभागल्या गेलेल्या द्रविडी राजकारणाचं चक्र भेदलं आहे. तामिळनाडूचा निकाल हा केवळ प्रस्थापितविरोधी नाही, तर त्याच-त्याच चेहऱ्यांना कंटाळलेल्या जनतेचा हा कौल आहे. तेच डीएमके, एआयएडीएमके पक्ष आणि तेच-तेच चेहरे नाकारून तमिळनाडूच्या मतदारांनी ताज्या दमाच्या नेत्याचा, ताज्या दमाचा पक्ष सत्तेजवळ नेऊन ठेवला आहे.

फारशी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या विजय यांचे वडील एस. ए. चंद्रशेखर हे चित्रपट दिग्दर्शक आहेत. त्यांनीही राजकीय पक्ष, राजकीय संघटना बांधण्याचा प्रयत्न केला होता. ▶▶उर्वरितपान२वर

श्री.गंगाभारती कृपा
आदित्य फर्निचर मॉल
7038389999
छत्रपती संभाजी महाराज चौक, बार्शी रोड, बीड

## कुजबुज...



**बीड मध्ये सध्या चालू असलेल्या कृषी प्रदर्शन मध्ये शेतकऱ्याच्या फायद्यासाठी असा कुठलाही प्रदर्शन आढळून येत नाही या प्रदर्शनामध्ये पाच फुटाचा सरड्या म्हणजे या या कृषी प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट दिसून येत आहे पण या कृषी प्रदर्शनामध्ये ज्या कोणीही प्रदर्शन भरवले आहे त्याचा मेन उद्देश शेतकरी आपल्या शेतीमध्ये तंत्रज्ञान वापरून आपल्या शेतीला चांगल्या प्रकारे उत्पन्नाचा पिके घेऊ शकेल पण असे काही नसून या ठिकाणी कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी पन्नास रुपये फी आणि त्या ठिकाणी जाऊन सरड्या पाहून असं वाटायला लागलंय हाल्या भुस खातो असल्या काही प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना जनतेला कृषी प्रदूषणापासून काही लाभ झालेला नाही असे कृषी प्रदर्शन भरवत असताना यामध्ये शेतकऱ्यांना काहीतरी फायदा व्हायला पाहिजे याचा विचार करावी**

## पत्नी नांदायला येत नसल्याच्या रागातून स्वत:च्या चिमुकल्या मुलींना जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील टालेवाडी येथील एका पित्याने आपल्या दोन चिमुकल्या मुलींच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा धक्कादायक प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. पत्नी नांदायला येत नसल्याच्या रागातून हे टोकाचे पाऊल उचलण्यात आले असून, नातेवाईकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे. या प्रकरणी आश्विनी महेश सोमासे (वय ३३. रा. टालेवाडी, ता. माजलगाव) यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**केज । प्रतिनिधी**



शहरातील एका भागात राहत असलेली शालेय शिक्षण घेत असलेली १५ वर्ष १० महिने वयाच्या मुलीचा पंधरा दिवसापूर्वी दि. १४ एप्रिल रोजी दुपारी १:०० ते ३:०० वा. च्या दरम्यान एका नराधमाने पाठलाग करून तिला आणि तिच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी देवून तिला त्याच्या राहते घरी बोलावुन घेतले. त्या नंतर त्याने त्या अल्पवयीन मुली सोबत बळजबरीने आणि जबरदस्तीने शारीरिक लैंगिक संबंध प्रस्थापित केले.

सदर घटने बाबत कोणाला काही सांगितल्यास मुलीच्या आई-वडील व भावाला जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच मुलीच्या मोबाईलवर आरोपीने व्हिडीओ कॉल करुन त्याचे मोबाईलची स्क्रीन शेअर केली आणि त्याच्याकडे असलेल्या पेनड्राईव्ह मधील बळजबरीने लैगींक अत्याचार केलेला व्हिडीओ दाखवला. तसेच आता सांगेल तसे कर. असे म्हणुन कपडे काढ म्हणाला, परंतु तिने नकार दिला असता व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिली. दरम्यान या प्रकरणी २ मे रोजी पीडितेच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात रेहान रियाज शेख याच्या विरुद्ध गु. र. नं. २५८/२०२६ भा. न्या. सं. ७४, ७५, ७६, ७८(१), ७९, ६४(२) (ळ), ६५(१), ३५१(२) (३) आणि पोक्सोचे कलम ४, ६, ८, १०, १२ नुसार ▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत शिवसंग्रामची बैठक संपन्न

### अल्पसंख्यांक व सामाजिक न्याय आघाडीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची घोषणा व सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'शिवसंग्राम भवन' येथे शहर पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली. आगामी काळातील संघटनेची बांधणी आणि विस्तार या दृष्टीने या बैठकीत विविध महत्त्वाच्या ▶▶उर्वरितपान२वर

# पेट्रोल-डिझेलच्या कृत्रिम टंचाई विरोधात मोर्चा

## रखरखत्या उन्हात जोरदार घोषणाबाजी; विश्वगति ट्रान्सपोर्टचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलची कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर 'विश्वगती मोटार चालक ट्रान्सपोर्ट असोसिएशन'च्या (महाराष्ट्र राज्य) वतीने आज, दि. ४ मे रोजी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधनाचा सातत्याने तुटवडा जाणवत आहे. पेट्रोल पंपावर डिझेल पेट्रोल आलं तर लांब लांबच लांब लागत असून परिणामी ट्रान्सपोर्ट व छोट्या मोठ्या व्यवसाय सह रिक्षा व्यवसायावर परिणाम होत आहे. यामुळे मालवाहतूक ठप्प होण्याच्या स्थितीत आहे. परिणामी वाहनधारकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून सर्वसामान्य नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर असोसिएशनने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय घेतला आहे. इंधन पुरवठा सुरळीत करावा आणि कृत्रिम टंचाईला ▶▶ उर्वरित पान २ वर

## तरुणाने गळफास घेऊन जीवन संपवले



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पालवन चौक परिसरात राहणारे राहुल सिताराम जगताप (वय ३७) यांनी सोमवारी (दि. ४ मे) सकाळी आपल्या राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना ▶▶ उर्वरित पान २ वर

बेसिक कोचिंग क्लासेस,बीड
इयत्ता १ ली ते १० वी सेमी
समर व्हॅकेशन बॅचेस
कालावधी २० एप्रिल ते १ जुन पर्यंत
१६ वर्षाची यशस्वी परंपरा
संचालक : वायभट एम.यु.
MO : 8575717171
प्रवेश देणे सुरु आहे
पत्ता : रेणु हॉस्पिटल शेजारी, शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड

# एक पित्ताची गोळी किती घातक असते....

(लेख : त्यांच्यासाठी आहे ज्यांना सतत ऍसिडिटी होते)
काल एक लेडीज पेशंट आली होती त्रास काय होतो तर म्हणे खूप औषध घेतले पण पोट साफ होत नाही...म्हणजे आमच्या भाषेत त्याला कॉन्स्टिपेशन (Constipation) असं म्हणतात. आता मग जरा बऱ्याच गोष्टी विचारल्या शेवटी एका गोष्टीने मला क्लू मिळाला..त्यांना म्हणलं पित्ताची गोळी जास्त दिवस घेतली होती का..उत्तर आलं 3 वर्ष झाले सारखं घेते.......इथेच लागते वाट आपल्या पोटाची.
चला सांगतो आता सगळं...
आजकाल ऍसिडिटी, जळजळ, पित्त या तक्रारींमुळे अनेकजण वर्षानुवर्षे गोळया घेत राहतात. विशेषतः Ranitidine, omee,omee-d rabezdsr pan d या सारख्या गोळयांचा वापर खूप सामान्य आहे. पण दीर्घकाळ वापर केल्यावर शरीरात नेमके काय बदल होतात?
चला सोप्या पण वैज्ञानिक भाषेत पाहूया ....
H2 Receptors म्हणजे काय?
पोटातील आतील लेअर वर असणारे H2 receptors हे Histamine mediated gastric acid secretion या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावतात. Histamine नावाचे केमिकल या receptors ला activate करून आम्ल (acid) तयार करते.आपण घेतलेली गोळी नेमके ही जे H2 Receptor's ला block करून acid कमी करतात.
आता ही रोज गोळी घेण्याची प्रक्रिया चालल्यावर शरीर compensatory mechanism वापरते आणि H2 receptors ची संख्या/संवेदनशीलता वाढते. आता होत काय की आपल्या शरीराला मेंदू ला याची सवय लागते एखादेवेळेस गोळी किंवा औषध अचानक बंद झाल्यावर acid जास्त प्रमाणात तयार होते त्यामुळे पित्ताची समस्या अधिक वाढते Tolerance किंवा त्याला आपण resistance म्हणू शकतो. H2 blockers चा परिणाम काही काळानंतर कमी होऊ लागतो म्हणजेच आधीची dose काम करत नाही रुग्णाला dose वाढवावं लागतो.
आता माझ्याकडे जी महिला रुग्ण आली होती तिचा problem काय होता हे समजून घेऊ आपण...
दीर्घकाळ acid suppression मुळे अन्न पचन होण्यासाठी जे ऍसिड लागतात , काही Enzymes लागतात काही Digestive juice लागतात या सगळयांवर फक्त ही एक गोळी आघात करते ती म्हणजे पित्ताची....
आता या सगळयांवर परिणाम झाल्याने काय होते प्रोटीन digestion कमी होते,Vitamin B12 absorption कमी होते,Calcium, Iron absorption वर परिणाम होतो आणि हे घटक शरीराला आवश्यक असतात.हे नसतील तर मग ,कमजोरी,ऍनिमिया,हाडे कमकुवत होणे पोट साफ न होणे या सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते..
पित्ताच्या गोळीने सगळयात मोठा दुष्परिणाम म्हणजे पोट साफ न होणे पोट जाम असल्यासारखं वाटने..त्यामुळे पित्ताच्या गोळीच सेवन जास्त प्रमाणात करू नका...
पुढच्या लेखात पाहू acidity कशी कमी करायची....
आजचा लेख मात्र खूप महत्वपूर्ण आहे हा लेख तुम्ही वाचला तर तुमच्या प्रोफाइल वर शेयर झालाच पाहिजे हा लेख वाचून भविष्यातील खूप मोठा प्रॉब्लेम होणारा टाळू शकतो..नवीन माहिती साठी फॉलो करा..

- डॉ रामप्रसाद श्रीराम राऊत
ईरा हॉस्पिटल घाटसावळी ता.जि बीड.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला. आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही. त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली. शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती. शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला. आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड शहरातील पेट्रोल ...

रुपये व ४ व्हिलर ला २००० रूपये च्या वर इंधन देऊ नये नसता जनतेचा उद्रेक झाल्या शिवाय राहणार नाही इंधनाचा काळा बाजार करणार्यांवर पुरवठा विभाग काय कार्यवाही करत आहे अनेक ठिकाणी इंधनाच्या टाक्या ची टाक्या घेऊन दलाल पंपावर ऐत आहे पण सर्व सामान्य वाहन धारक यांना बॉटल मध्ये पेट्रोल डिझेल दिले जात नाही ज्याची पंप मालक किंवा कर्मचारी यांच्या सोबत ओळख आहे अशांना नियम धाब्यावर बसवून वाटेल तसे पेट्रोल डिझेल दिले जाते मलींदा खाणार्या पुरवठा अधिकारी व कर्मचारी यांनी झोपेचे सोंग घेऊन या कडे दुर्लक्ष केले आहे व एका ही पंप धारकावर कार्यवाही केली नाही असे विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

## पाटोद्यात लाखोंचा.....

शेतकऱ्यांनी वारंवार दुकानावर जाऊनही तो भेटला नाही. शेजारील दुकानदारांकडे चौकशी केली असता, दुकान एक महिन्यापासून बंद असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर शेतकऱ्यांनी शिखरवाडी येथील त्याच्या मूळ गावी जाऊन चौकशी केली असता कुटुंबीयांनीही त्याच्या ठिकाणाबाबत अनभिज्ञता दर्शवली. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित आडत व्यापाऱ्यावर तातडीने गुन्हा दाखल करून कठोरात कठोर कारवाई करावी तसेच प्रलंबित रक्कम त्वरित मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे

## समाज बांधवांनी....

माध्यमातून एका समाजापुरते मर्यादित ठेवू नका महापुरुषांचे विचार आत्मसात करून उपेक्षित समाजातील सर्व युवकांनी महापुरुषांच्या जयंत्या नाचून नाहीतर वाचून साजऱ्या कराव्यात हेच सर्वात मोठे अभिवादन आहे. वर्षभरातील ३६५ दिवस वाचन करून जयंती उत्सव साजरा करा व आपल्या प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करावा. यावेळी इंजि. विष्णू देवकते, अर्जुन क्षीरसागर, आनंद पिंगळे, संतोष जाधव, जयंत करपे (सर), भारत कानडे, अनुरत वीर, भगवान वाघमारे, नारायण करपे, अमोल गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, दिलीप देवडे, नितीन वाघमारे, रोहन घोडके, संभाजी थोरात, अमोल वाघमारे, अनिल भिसे, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, सचिन बीडकर, भरत करपे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक किरण वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक महादेव इंनकर यांनी केले.

## माजलगावमध्ये तीन....

असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या सर्व प्रकाराकडे पोलीस प्रशासन मात्र गप्प असल्याचे दिसून येत आहे. वारंवार तक्रारी होऊनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. नियम मोडणाऱ्या ऑटोचालकांवर कडक दंडात्मक कारवाई करणे, परवाने रद्द करणे आणि नियमित तपासणी मोहीम राबवणे, ही काळाची गरज बनली आहे.

## नसरापुर प्रकरणी....

व तातडीची कारवाई व्हावी, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. याचवेळी न्याय मागणीसाठी आंदोलन करणाऱ्यांवर लाठीमार करणा-या पोलिस यंत्रणेचाही निषेध करण्यात आला.आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथजी, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्राताई पवार निवेदन पाठविण्यात आले. या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,मुबीन शेख, सय्यद सादेक ,रामधन जमाले,बाजीराव ढाकणे,प्रा.डी.जी.तांदळे, डॉ.संजय तांदळे, किष्किंधा पांचाळ, मुस्ताक शेख आदींचा सहभाग होता.

◆ पान ९ वरून पुढे...

## बारामतीत सुनेत्रा....

असे वाटले नव्हते. बारामतीकरांचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी पूर्ण करायची आहे. ही माझी सुरूवात आहे. शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळेंनी ज्याप्रकारचे बारामतीत काम, विश्वास आणि सेवा केली आहे. एकंदर बारामतीकरांचा आमच्या कुटुंबावर विश्वास आहे. तो विश्वास आजच्या मतातून दाखवला आहे, असेही सुनेत्रा पवारांनी सांगितलं.

## ममता बॅनर्जींना....

ममता बॅनर्जी यांचा या मतदारसंघातून पराभव झाला आहे. विशेष म्हणजे भाजपाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी तब्बल १५ हजार मतांनी ममता बॅनर्जी यांना पराभूत केले आहे. सुवेंदू अधिकारी यांचा मोठा विजय– मतदानाला सुरुवात झाली तेव्हापासून या जागेवरून कधी ममता बॅनर्जी आघाडीवर जात होत्या. तर कधी सुवेंदू अधिकारी मसुंडी मारताना दिसत होत्या. अजूनही त्या जागेवरची मतमजोणी चालूच होती. आता तेथील निकाल स्पष्ट झाला आहे. भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. पक्षाच्या सर्वेसर्वा असणाऱ्या ममता बॅनर्जी यांनाच पराभवाला समोरे जावे लागल्याने तृणमूलासाठी हा सर्वात मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. कोणाला किती मतं पडली– सुवेंदू अधिकारी या जागेवरून १५११४ मतांच्या फरकाने निवडून आले आहेत. त्यांना एकूण ७३४६३ मतं मिळाली आहेत. या विजयानंतर त्यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. ममता बॅनर्जी यांना पराभूत करणे फार महत्त्वाचे होते. हिंदू मतदारांनी मला विजयापर्यंत नेलं. आमच्या मेहनतीला फळ लागले आहे, अशी प्रतिक्रिया सुवेंदू अधिकारी यांनी व्यक्त केली. कोणत्या पक्षाला किती जागा ? पश्चिम बंगालमध्ये एकूण २९३ जागांसाठी निवडणूक झाली होती. यापैकी २०८ जागांवर भाजपाचा विजय झाला आहे. तर तृणमूल काँग्रेसचा फक्त ७९ जागांवर विजय झाला आहे. काँग्रेसला दोन जागा तर डाव्या पक्षांना दोन जागा मिळाल्या आहेत. एमआयएम पक्षाला एकही जागा जिंकता आलेली नाही. ही बातमी आताच ब्रेक झाली आहे. या बातमीला आम्ही अजुनही अपडेट करत आहोत. तुम्हाला सर्वात आधी माहिती पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे ह्या पेजला रिफ्रेश करत चला. तसेच आमच्या इतर स्टोरीज वाचण्यासाठी इथं क्लिक करा.

## अनेक धुरंधरांना....

मात्र त्यांना त्यात फारसं यश आलं नाही. त्यांच्या मुलानं मात्र पहिल्याच फटक्यात तामिळी राजकारणातल्या धुरंधर नेत्यांना चारी मुंड्या चित केलं आहे. प्रस्थापित नेत्यांवर सातत्यानं होणारे भ्रष्टाचाराचे आरोप आणि विजय यांची कोरी राजकीय पाटी हे समीकरण जुळून आल्यानं तामिळनाडूत हा चमत्कार बघायला मिळाला. विजय यांचे वडील एस. ए. चंद्रशेखर म्हणाले की, गेल्या ३० वर्षापासून विजय तामिळ लोकांसाठी काहीतरी करायचं असा विचार करतोय. त्याच विचारातून त्याने राजकारणात प्रवेश केला. आता तो तामिळनाडूचा मुख्यमंत्री होईल, तामिळ लोक त्याच्यावर भरभरून प्रेम करतील.

## पत्नी नांदायला....

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, आश्विनी सोमासे आणि त्यांचे पती महेश विष्णू सोमासे यांच्यात किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. त्यामुळे त्या मागील काही दिवसांपासून माहेरी लहामेवाडी येथे राहत होत्या. १६ एप्रिल रोजी महेश सोमासे लडामेवाडी येथे गेले आणि त्यांनी आश्विनी यांना नांदायला चालण्यास सांगितले. मात्र, वारंवार होणाऱ्या भांडणामुळे आश्विनी यांनी येण्यास नकार दिला. तेव्हा महेश सोमासे यांनी आपल्या दोन्ही मुली मृणाल (वय ५) आणि मृणमय (वय ४) यांना जबरदस्तीने सोबत नेले आणि तू नांदायला आली नाहीस तर मुलींना जाळून मारीन' अशी धमकी दिली होती. दिनांक २ मे २०२६ रोजी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास महेश सोमासे पुन्हा लहामेवाडी येथे दुचाकीवर दोन्ही मुलींना घेऊन आले. त्यांनी पुन्हा पत्नीला नांदायला येण्यासाठी दबाव टाकला. आश्विनी यांनी चार–पाच प्रतिष्ठित माणसांना घेऊन बैठक करून वाद मिटवण्याची विनंती केली, मात्र महेश सोमासे यांनी संताप व्यक्त करत पिशवीतील डिझेलचा कॅन काढला. त्यांनी दोन्ही मुलींच्या अंगावर डिझेल ओतून काड्यापेटीने त्यांना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. यावेळी आश्विनी आणि त्यांच्या आईने आरडाओरडा केल्याने नातेवाईक आसाराम तान्हेबा चिंचोलकर यांनी तातडीने हस्तक्षेप करत महेश यांच्या हातातील कॅन आणि काड्यापेटी हिसकावून घेतली. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात महेश विष्णू सोमासे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ ३५१(२) ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप नारायण राठोड हे करत आहेत.

## व्हिडिओ व्हायरल....

गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत. या गुन्ह्यातील आरोपी रेहान शेख यास न्यायालयासमोर हजर केले असता त्याला ६ मे पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## डॉ.ज्योतीताई मेटे....

जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.या बैठकीत संघटनेच्या विविध आघाड्यांवर नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये श्री.कुतूबभाई यांना अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष,श्री. सुनील शिंदे यांना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष,श्री. विठ्ठल ढोकणे यांना सामाजिक न्याय विभाग बीड तालुकाध्यक्ष, श्री.शेख आंबेद भाई यांना अल्पसंख्यांक आघाडी बीड जिल्हा उपाध्यक्ष,श्री.अमजद भाई पठाण यांना अल्पसंख्यांक आघाडी बीड शहराध्यक्ष तर श्री.शेख लालाभाई यांना अल्पसंख्यांक आघाडी, बीड तालुकाध्यक्ष अश्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या. शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे आणि प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे यांच्या हस्ते या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत यश संपादन केलेल्या सरपंच व सदस्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये कपिलधारवाडी येथील युवा नेते रुद्रा महाकले यांचे बंधू श्री. चंद्रसेन अश्रुबा महाकले यांचा गौरव करण्यात आला.तसेच, पोलीस पाटील पदाच्या परीक्षेत यश मिळवून चऱ्हाटा येथे नियुक्त झालेले श्री. ज्ञानेश्वर बबनराव उबाळे आणि बेलखंडी पाटोदा येथे पोलीस पाटील पदी नियुक्त झालेल्या सौ.अश्विनी बाळू जाधव यांच्या वतीने श्री. बाळासाहेब जाधव यांचाही डॉ. ज्योतीताईंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.शिवसंग्राम महिला आघाडीच्या शहराध्यक्ष सौं. संगीताताई ठोसर यांचा वाढदिवस यावेळी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी त्यांना अभिष्टचिंतन करत पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.बैठकीचे प्रास्ताविक शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी केले, तर प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप करताना डॉ.ज्योतीताई मेटे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना संघटना वाढीसाठी सक्रिय राहण्याचे आवाहन केले. शेवटी, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने यांनी उपस्थितांचे आभार मानले.या बैठकीला शिवसंग्रामचे अनेक पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## पेट्रोल-डिझेलच्या...

आळा घालावा, ही मुख्य मागणी निवेदनाद्वारे केली आहे.मोर्चापूर्वी सकाळी ११ वाजता शहरातील 'अन्विता हॉटेल' येथे सर्व ट्रान्सपोर्ट सदस्य, मोटार मालक व चालकांनी एकत्र येऊन रखरखत्या उन्हामध्ये घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा निघाला या आंदोलनात ट्रान्सपोर्ट संघटनेसह रिक्षा चालक–मालक संघटना देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते या मोर्चाचे आयोजन प्रदेशाध्यक्ष विजय काकडे यांनी केले होते.

## तरुणाने गळफास....

उघडकीस आली. ते मजुरी करून उदरनिर्वाह करत होते. या घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.राहुल हा अत्यंत कष्टाळू व मेहनती होता मधल्या काळात तो संभाजीनगर येथे कामासाठी गेला होता परंतु मागील आठवड्यात तो बीडला येऊन त्याने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याने हळूहळू व्यक्त केली जात आहे. मृतांच्या पार्थिवावर आज दुपारी ४ वाजता अंकुश नगरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात आई–वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# औद्योगिक वसाहतीतील समस्यांबाबत तात्काळ उपाययोजना करण्याचे जिल्हाधिकारी गौडा जी.सी. यांचे निर्देश

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत असणाऱ्या समस्या निकाली काढण्याबाबत शासन सकारात्मक व तत्पर आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांचा आणि उद्योग संघटनांचा परस्पर समन्वय असणे आवश्यक आहे. सर्व संबंधित विभागांनी या समस्यांवर समन्वय राखून तात्काळ उपाययोजना कराव्या,असे निर्दे श जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले. जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. जिल्हा उद्योग केंद्राच्या



महाव्यवस्थापक करुणा खरात, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके,मनपा उपायुक्त लखीचंद चव्हाण, राष्ट्रीय महामार्गचे अधीक्षक अभियंता आशिष देवकर, पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, उद्योग संघटनांचे प्रतिनिधी दुष्यंत आठवले, राजेंद्र चौधरी, राजेश मंथारी आदी उपस्थित होते. उद्योजक संघटनांच्या प्रतिनिधींनी यावेळी औद्योगिक वसाहतीतील रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा, वीज पुरवठ्याची उपकेंद्र, सुरक्षा व्यवस्था याबाबत आपले प्रश्न मांडले. उद्योगांना समाजकंटकांकडून होणारा त्रास याबाबत जिल्हाधिकारी गौडा यांनी स्पष्ट निर्देश देऊन सीसीटीव्ही यंत्रणा व पोलीस गस्त वाढविण्याचे निर्देश दिले. तसेच अशा समाजकंटकांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे निर्दे श दिले. औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांवर गतिरोधक हे निकषांप्रमाणे बसावावे असेही त्यांनी सांगितले.



माजलगाव समता परिषद तालुका अध्यक्ष जगन खेत्री याना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना संतोष रासवे विलास जाधव संतोष पुरी सोमेश्वर हिवरकर संतोष खेत्री बाबासाहेब गरड सह मित्र परिवार



माजलगाव बीड लोकरंजन संपादक परमेश्वर बप्पा सोळके याना वाढदिवसाच्या शुभेच्छ देताना संतोष रासवे बाळासाहेब आडागळे महादेव नाना आढाव व सहकारी मित्र

# मिराई नगरी सहकारी पतसंस्था मर्यादित, बीड यांना महाराष्ट्र उद्योगरत्न पुरस्कार 2026 ने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

मिराई नगरी सहकारी पतसंस्था मर्यादित, बीड यांना महाराष्ट्र उद्योगरत्न पुरस्कार २०२६ या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वित्तीय सेवा क्षेत्रात सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार १ मे २०२६ रोजी नाशिक येथे पार पडलेल्या सोहळ्यात महाराष्ट्राचे सुप्रसिध्द अभिनेते मा. श्री मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते देण्यात आला. उद्योग व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व उद्योजकांचा



गौरव करण्यासाठी हा पुरस्कार ठशीशरश्र.ळप या संस्थेकडुन प्रत्येक वर्षी दिला जातो. मिराई नगरी सहकारी पतसंस्थेने ग्राहकाभिमुख सेवा, पारदर्शक व्यवहार आणि आर्थिक सबलीकरणाच्या दृष्टीने केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे. संस्थेच्या या यशामुळे बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाल्याचे मत संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री खरसाडे रघुनाथ (नाना) यांनी व्यक्त करण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक गुणवत्तापूर्ण सेवा देण्याची प्रेरणा मिळाल्याची प्रतिक्रिया संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री खरसाडे नवनाथ यांच्याकडून देण्यात आली आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयाचे इयत्ता बारावी परीक्षेत घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष-२०२५-२६ मधील इयत्ता बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांची फेब्रुवारीमध्ये झालेल्या बोर्डाच्या परीक्षेत महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाचा निकाल ७९.१२% , कला विभाग ४७.०५ ,कॉमर्स ९५.२३ तर व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा ६६.६६% एवढा निकाल लागलेला आहे.संस्कृत विषयात गोकुळे श्रीनिवास व बोराडे अंजली यांना १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. चि. उत्कर्ष उमेश बोबडे विज्ञान शाखेतून ८०.६७ टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे तर कला शाखेत सोहम ज्ञानेश्वर मांगरे ६१.५० टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे. वाणिज्य शाखेतून वैष्णवी अण्णासाहेब जाधव प्रथम आली आहे. तसेच एमसीव्हीसी शाखेतून तेजस्वी मिलींद डोळस ६४.५०% गुण घेऊन प्रथम आली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई भारतभूषण क्षीरसागर ,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर नगरसेवक तथा नवगण शिक्षण संस्थेच्या संचालक

# आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'बायोगॅस'चा जागर

## कचऱ्यातून होणार ऊर्जा निर्मिती ; एलपीजी खर्चात कपात ; सेंद्रिय स्लरीचा बागेसाठी होणार वापर

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षण आणि अक्षय ऊर्जेच्या वापराकडे एक पाऊल टाकत, शहरातील आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात नवीन बायोगॅस प्लांटची यशस्वीरीत्या जोडणी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे महाविद्यालयाचा परिसर आता 'झिरो वेस्ट' (शून्य कचरा) मॉडेलकडे वाटचाल करणार असून, कॅन्टीन आणि हॉस्टेलमधील सेंद्रिय कचऱ्यापासून गॅस निर्मिती केली जाणार आहे.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या प्रेरणेतून कॅम्पसमध्ये शाश्वत विकासाचे विविध उपक्रम राबवले जातात. याच मालिकेत हा बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे आदित्य महाविद्यालयाने शिक्षण क्षेत्रासोबतच पर्यावरण संवर्धनातही आपला वेगळा ठसा उमटवला असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या प्रकल्पामुळे एलपीजी सिलिंडरवर होणारा मोठा खर्च आता कमी होणार आहे, कचरा व्यवस्थापन सोपे झाल्याने कॅम्पस स्वच्छ राहील, कृषी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना बायोगॅस तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान मिळेल, रासायनिक खतांचा वापर थांबवून दर्जेदार सेंद्रिय खताची निर्मिती होईल. या प्रकल्पाची क्षमता ६ क्यूबिक मीटर आणि १ क्यूबिक मीटर अशी असून, यामध्ये प्रामुख्याने कॅन्टीनमधील भाजीपाल्याचे अवशेष, उरलेले अन्न, शेण, पालापाचोळा आणि इतर सेंद्रिय कचरा वापरला जाणार आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांसाठी सोनपेठ येथे ८ मे रोजी रोजगार मेळावा

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मे, २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता सोनपेठ येथील केंद्रीय कन्या प्रशाला येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा भव्य महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास विविध नामांकित राज्यातील मोठे उद्योजक/ कंपन्या व जिल्ह्यातील खाजगी आस्थापना सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी, ट्रेनी ऑपरेटर, लाईफ मित्र, फिल्ड सिस्टंट ट्रेनी, इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी वेतन १० ते २५ हजार असून, अनुभवावरून वेतनामध्ये वाढ होऊ शकते. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थींची निवड देखील करण्यात येणार असून त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार प्रतिमाह ६ ते १० हजार इतके विद्यावेतन ११ महिन्यांकरिता देण्यात येणार आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या (रहरीूरा.सीं.ळप) या संकेतस्थळावर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्यासाठी दि. ८ मे रोजी सकाळी ८.३० वाजता केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दूरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे.

# कामगार कार्यालयातील भ्रष्टाचाराविरोधात 20 एप्रिलला ठिय्या आंदोलनाचा इशारा- श्री रामधन जमाले इंटक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बीड

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा कामगार कार्यालयातील कथित एजंटशाही, भ्रष्टाचार आणि बोगस लाभार्थी प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे जिल्हाध्यक्ष श्री. रामधन रानबा जमाले यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास २० एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

जमाले यांनी दिलेल्या निवेदनानुसार, बीड जिल्हा कामगार कार्यालयात अधिकारी आणि खासगी एजंट यांच्या संगनमताने विविध शासकीय योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. खऱ्या व पात्र कामगारांना योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत असून, बोगस लाभार्थ्यांच्या माध्यमातून लाखो रुपयांचा



अपहार होत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. याशिवाय, अर्ज प्रक्रियेत लाचलुचपत होत असून 'एजंटशिवाय काम होत नाही' अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

दिनांक ६ मार्च २०२६ रोजी याच मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले होते; मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने इंटकच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, मागील तीन वर्षांतील लाभार्थ्यांची यादी जाहीर करून चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करून सेवेतून बडतर्फ करावे, अशा ठोस मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. यासोबतच कामगारांसाठी पारदर्शक ऑनलाइन प्रणाली व स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कारवाई न केल्यास २० एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# ढेकनमोहा येथे महाकारूणी तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**ढेकणमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे महाकारुणी तथागत गौतम बुद्ध तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व पंचशील ध्वजारोहणाने झाली. युवा रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. त्यानंतर दुपारी ४ वाजता पूज्य भिक्खू धमशिल थेरो (शिवणी) यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. या मिरवणुकीत सुमारे ७० भंतेजींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामुळे सारा परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीनंतर पूज्य भिक्खू धमशिल थेरो यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समता, बंधुता व शिक्षणाचा संदेश देत समाजाने या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. लहान मुलांच्या भाषणांचा कार्यक्रम पार पडला. बालकांनी बुद्ध व आंबेडकरांच्या जीवनकार्यावर प्रभावी विचार मांडले. सायंकाळी साक्षी साळवे यांचा गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी पप्पु कागदे युवा प्रदेश अध्यक्ष रिपाइं, पु भिकुखु धमशिल थेरो, पोलीस उपनिरीक्षक आत्माराम गर्जे, अरुण नाना डाके माजी सभापती, किशनराव तांगडे रिपाइं तालुका अध्यक्ष, महादेव दादा उजगरे वडवणी तालुका अध्यक्ष, शाहुराव डोळस रिपाइं जिल्हा अध्यक्ष दिव्याग, सुधीर काकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष, भगीरथ बांडे माजी सरपंच, बंडु नाना घूमरे सरपंच वलीपुर, वसंत गुंदेकर माजी सरपंच, विक्रम डोळस, बालापसाद जाजु चेअरमन, परमेश्वर थापडे उपसरपंच, भारत देवकाते शिवसेना उपतालुकाप्रमुख, नारायण देवकते ग्रामपंचायत सदस्य, शरद देवकते, सतिश शिनगारे, भिमराव घोडेराव, प्रा.आमीत सवाई, राहुल कोरडे, युवराज जाधव, बळीराम थापडे, गणेश प्रधान, संतोष देशमुख सर कपिल तांगडे, रुद्रा मिसळे, महादेव थापडे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी दिलीप शिंदे, नागेश शिंदे, नंदू शिंदे, अरविंद शिंदे, दयाराज शिंदे, सखाराम शिंदे, विनोद शिंदे, विकास शिंदे, बापू शिंदे, बाबासाहेब शिंदे, बाबासाहेब डोंगरे ,विपिन शिंदे, महादेव शिंदे, अजय शिंदे, प्रकाश शिंदे, आनंद शिंदे, पोपट शिंदे, प्रभाकर शिंदे, दादा किसन शिंदे, बारीक शिंदे, वसंत शिंदे, कृष्णा शिंदे, समाधान शिंदे,कृष्णा ससाने, रमेश शिंदे, शहादेव शिंदे, विकी शिंदे, विश्वनाथ शिंदे, किसन शिंदे, राजेंद्र साळवे, दत्ता शिंदे, ऋषिकेश शिंदे, विश्वजीत शिंदे, अभिजीत शिंदे, रघुनाथ शिंदे, अरुण शिंदे पोपट शिंदे, भगवान शिंदे,राहुल शिंदे, आकाश शिंदे, युवराज गायकवाड, सुनील शिंदे , कृष्णा शिंदे, दिनेश पिसाळ, दिनकर येवले, चत्रभुज थापडे, डॉ.किशोर डोंगरे, संतोष ससाणे, रमेश जावळे, रमेश शिंदे, कचराप्पा शिंदे, नवनाथ शिंदे, धम्मानंद शिंदे,गोरख चौरे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले,

दैनिक मराठवाडा पत्र

मंगळवार, दि. ०५ मे २०२६



## बीड शहरातील पेट्रोल पंप धारक यांना कोणाचाही धाक नसल्याने मनमर्जी कारभार सुरू ; विशाल इंगोले



**बीड । प्रतिनिधी–** सध्या बीड जिल्ह्यात पेट्रोल डिझेल चा तुटवडा निर्माण झाला असताना सुद्धा अनेक पेट्रोल पंप धारक साठा शिल्लक असताना सुद्धा नो स्टॅक चे बोर्ड लावून हात झटकत आहे ज्या पंपावर पेट्रोल डिझेल ऐईल ते पंप धारक सुध्दा जनतेवर उपकार केल्यासारखे किंवा खेरात वाटण्यासारखे पेट्रोल डिझेल देत आहे पंपावर गर्दी असल्याने इतर वाहन धारकांचा विचार केला जात नाही गाड्या फुल करून जेवढ्यांना पुरेल तितके पेट्रोल डिझेल देत आहे यावर निर्बंध घालण्यात आले पाहिजे व टु व्हिलर ला २०० ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाणीटंचाई, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात घेतली आ.संदिप क्षीरसागरांनी आढावा बैठक

## उन्हाळ्याच्या काळात पाणीटंचाई भासू नये यासाठी नियोजन करण्याच्या दिल्या प्रशासनाला सुचना

**बीड । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या काळात नागरिकांसमोर पाणीटंचाई सारखे संकट उभे राहू नये. त्या संदर्भात नियोजन करून तातडीने पाणीटंचाईच्या अनुषंगाने उपाययोजना कराव्यात अशा सुचना आ.संदिप क्षीरसागर यांनी प्रशासनाला केल्या आहेत. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या आणि पीक विम्याच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकी दरम्यान त्यांनी संबंधित अधिकार्यांना सुचना दिल्या आहेत.

सोमवार (दि.४) रोजी पाणी टंचाई आणि शेतकर्यांच्या विविध समस्या यांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी शासकीय विश्रामगृह बीड येथे पंचायत समिती, कृषी विभाग आणि इतर विभागांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत बीड मतदारसंघातील बीड व शिरूर



(का.) तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये पाणी टंचाई सारखी भीषण समस्या निर्माण होऊ नये यासाठी टँकरने पाणी पुरवठा, जलस्त्रोत अधिग्रहण आणि इतर उपाययोजना करण्या संदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली. पाणी टंचाईला होऊ नये यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर नियोजन करून उपाय योजनांची अंमलबजावणी तात्काळ करावी, अशा सुचना आ.क्षीरसागर यांनी दिल्या. तसेच, पीक विमा, पी.एम.किसान योजना तसेच शेतकर्यांसाठी शासनाकडून राबविण्यात येणार्या विविध योजना आणि शेतकड्यांच्या दृष्टीने त्यामध्ये असलेल्या अडचणी या बाबत देखील यावेळी आ.क्षीरसागर यांनी कृषी विभागाच्या अधिकाड्यांकडून आढावा घेवून आवश्यक त्या सुचना केल्या. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड पंचायत समिती, शिरूर (का.) पंचायत समिती, कृषी विभाग येथील संबंधित अधिकारी यांची उपस्थिती होती.

### ● आवश्यक असलेल्या गावांमध्ये टँकर मागणीसाठी प्रस्ताव सादर करा– आ.संदिप क्षीरसागर

**बीड विधानसभा मतदारसंघातील बीड व शिरूर का. तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये उन्हाळ्यातील होणाड्या पाणी टंचाई साठी आवश्यक असलेल्या गावांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेवून टँकर मागणीचे प्रस्ताव आपल्या पंचायत समितीकडे सादर करावेत, असे आवाहन आ.संदिप क्षीरसागर यांनी केले आहे.**

## पाटोद्यात लाखोंचा शेतीमाल घेऊन आडत व्यापारी पसार

# शेतकऱ्यांची पोलीस ठाण्यात धाव

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पाटोदा येथील जयभवानी ट्रेडिंग कंपनी (आडत दुकानचे) मालक संदीप रामराव नवले (रा. शिखरवाडी ता. पाटोदा जि. बीड) यांनी शेतकऱ्यांकडून सोयाबीन, हरभरा व इतर शेतीमाल खरेदी करून



त्याचे पैसे न देता दुकान बंद करून पसार झाल्याने नफरवाडी, नागशवाडी,बेलेवाडी, वाघिरा, वैजाळा व इतर गावांतील शेतकऱ्यांनी याबाबत पोलीस ठाण्यात धाव घेत निवेदनाद्वारे तक्रार केली आहे. संबंधित आडत व्यापारी गेल्या ८ ते ९ वर्षांपासून शेतीमाल खरेदी–विक्रीचा व्यवसाय करत होता. विश्वासावर शेतकऱ्यांनी त्याच्याकडे माल विक्री केला होता. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, माल खरेदी करताना १० ते १५ दिवसांत किंवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत पैसे देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. यासाठी पावत्या देखील देण्यात आल्या होत्या. मात्र, आता जवळपास महिनाभर उलटून गेला तरी व्यापारी संपर्कात नसून दुकान बंद आढळत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## समाज बांधवांनी संघटित होवून संघर्ष केला तरच नवक्रांती निर्माण होईल:पप्पू कागदे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील उपेक्षितांना सामाजिक शैक्षणिक व आर्थिक प्रवाहात आणून त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती करून उपेक्षित समूहातील समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले. आगामी काळात युवकांनी थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून नवक्रांती घडविण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करावा. असे आवाहन युवा



रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मौजे कुमसी ता.जि.बीड या गावी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संयुक्त जयंती निमित्त आयोजित जयंती उत्सवात केले. पुढे बोलताना कागदे म्हणाले की, थोर महापुरुषांनी कुठल्याही एका जातीच्या समाजासाठी काम केलेले नाही. महापुरुषांना जयंतीच्या ▶ उर्वरित पान २ वर

## माजलगावमध्ये तीन चाकी ऑटोचालकांची दादागिरी

## इंडिकेटर नियमांकडे दुर्लक्ष, पोलीस प्रशासन मौन का?

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात तीन चाकी ऑटोचालकांकडून सुरू असलेली दादागिरी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. वाहतूक नियमांचा सर्रास भंग होत असून विशेषतः इंडिकेटरचा वापर न करता वाहन चालवणे, अचानक वळणे घेणे आणि प्रवाशांच्या तसेच इतर वाहनचालकांच्या जीवाशी खेळ करणे, ही बाब चिंताजनक ठरत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर ऑटोचालकांकडून कोणत्याही प्रकारची शिस्त पाळली जात



नसल्याचे चित्र दिसते. इंडिकेटरचा वापर करणे हा मूलभूत वाहतूक नियम असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● अल्पवयीन चालक आणि महिलांची छेडछाड – गंभीर प्रश्न दुर्लक्षित

**माजलगावमध्ये काही ठिकाणी अल्पवयीन मुलांकडून तीन चाकी रिक्षा चालवली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. हे केवळ कायद्याचे उल्लंघन नसून अपघातांना आमंत्रण देणारे आहे. यासोबतच काही महिलांनी रिक्षाचालकांकडून गैरवर्तन व छेडछाडीच्या घटनांची तक्रार केल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. या प्रकरणांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.**

## नसरापुर प्रकरणी आरोपीला फाशीची मागणी

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापुर येथे साडे तीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा निर्घृण खून झाल्याच्या घटनेने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते





डॉ. गणेश ढवळे लिंबाणेशकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात, प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून ३० दिवसांत आरोपपत्र दाखल करावे व पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळवून द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. अनेक प्रकरणांमध्ये केवळ घोषणा होतात, पण खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या प्रकरणात तरी ठोस ▶▶ उर्वरित पान २ वर

## गीता परिवार बीड तर्फे संस्कार शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्या बुद्धीला चालना मिळावी यासाठी गीता परिवार दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ६ मे ते १५ मे या दरम्यान द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर येथे संस्कार वर्गाचे आयोजन करीत आहे. शिबिराची वेळ दुपारी साडेतीन ते साडेसहा पर्यंत आहे.

या मध्ये भगवद्गीता अध्याय, पसायदान, मंगलस्मरण, बौद्धिक खेळ, दांडिया, रांगोळी, योग सोपान, प्राणायाम, हास्ययोग, कालभैरवाष्टक टाकाऊतून टिकाऊ हस्तकला शिकवल्या जातील व दररोज अल्पोपहार दिला जाईल यासाठी फक्त दोनशे रुपये शुल्क आकारण्यात येत आहे दररोज मुलांनी घरून वही पेन, भगवद्गीता, दांडिया, आसन व रिकामा डबा आणावे,

पालकांसाठी दिनांक ४ मे रोजी पाच वाजता संतोषी माता मंदिर येथे कार्यशाळा व चर्चासत्र याचे आयोजन केले आहे तरी या चर्चासत्रामध्ये शिबिरामध्ये सहभाग घेणाऱ्या मुलांच्या पालकांनी सामील व्हावे व जास्तीत जास्त आपल्या मुलांना या शिबिराचा लाभ घ्यावा ही गीता परिवारातर्फे नम्र विनंती

चार मे नंतर रजिस्ट्रेशन करणाऱ्या मुलांसाठी अडीचशे रुपये शुल्क आकारण्यात येईल.

# माजलगावात बेकायदेशीर मुरुम उत्खननाचा धुमाकूळ



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात सध्या बेकायदेशीर मुरुम उत्खननाचा मुद्दा ऐरणीवर आला असून स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तहसीलदार आणि एचडीएम यांच्या कार्यक्षेत्रात दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात मुरुमाचे उत्खनन सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे महसूल विभागाला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत असून पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही महिन्यांपासून विविध ठिकाणी ट्रॅक्टर आणि डंपरच्या सहाय्याने मुरुमाची अवैध वाहतूक सुरू आहे. नियमांना धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या कारवायांकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन शक्य नाही, असा आरोप काही स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे तहसील प्रशासन आणि संबंधित महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय अधिक गडद होत आहे.

या पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा नागरिकांकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, एवढ्या गंभीर प्रकारावर हवा खाते म्हणजेच संबंधित विभागातील अधिकारी अद्यापही गप्प का आहेत, हा सवाल अनुत्तरितच आहे. प्रशासनाची ही भूमिका भविष्यात आणखी गंभीर परिणाम घडवू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### ● तहसीलदारांची बदली का ?

**माजलगावातील बेकायदेशीर मुरुम उत्खनन प्रकरणामुळे तहसीलदारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सततच्या तक्रारी असूनही ठोस कारवाई न झाल्याने त्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता राखण्यासाठी आणि चौकशी निष्पक्ष व्हावी यासाठी तहसीलदारांची बदली करण्याची मागणी पुढे येत आहे.**

### ● एचडीएम गप्प का ?

**या संपूर्ण प्रकरणात एचडीएम कार्यालयाची भूमिका देखील चर्चेत आली आहे. महसूल नुकसान आणि पर्यावरणीय हानी होत असतानाही एचडीएम स्तरावरून कोणतीही ठोस कारवाई दिसून येत नाही. त्यामुळे एचडीएम यांचे मौन हे केवळ दुर्लक्ष आहे की काही अन्य कारण, याबाबत नागरिकांमध्ये संशय निर्माण झाला आहे. या संदर्भात स्पष्ट भूमिका घेण्याची मागणी होत आहे.**